दिनांक: ११/०३/२०२४

# वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या विस्तारित मेट्रो मार्गिकेस राज्य शासनाची मंजुरी




| Line | Vanaz - Chandni Chowk | Ramwadi - Wagholi | |
|---|---|---|---|
| Details | 1.12 KM \| 2 Stations | 11.63 KM \| 11 Stations | |
| Stations | • Kothrud Bus Depot Station<br>• Chandani Chowk Station | • Viman Nagar Station<br>• Somnath Nagar Station<br>• Kharadi Bypass Station<br>• Tulaja Bhavani Station<br>• Ubale Nagar Station<br>• Upper Kharadi Road Station | • Wagheshwar Temple Station<br>• Wagholi Station<br>• Siddharth Nagar Station<br>• Bakori Phata Station<br>• Vitthalwadi Station |
| Cost | ₹ 3756.58 Crs | | |

पुणे मेट्रोच्या वनाझ ते रामवाडी मार्गीकेच्या दोन्ही बाजूला विस्तारित होणाऱ्या मार्गिकेचा (वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली) डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) महामेट्रो ने बनविला होता. पुणे मनपाच्या मान्यतेनंतर तो राज्य शासनाला सादर करण्यात आला. आज दिनांक ११ मार्च २०२४ रोजी राज्यशासनाने या दोन्ही विस्तारित मार्गाला मान्यता दिली आहे.

वनाझ ते रामवाडी या विस्तारित मार्गाची लांबी १.१२ किमी असून त्यावर २ स्थानके असणार आहेत. तसेच हा मार्ग संपूर्णपणे उन्नत असणार आहे. या मार्गावरील दोन स्थानके कोथरूड बस डेपो व चांदणी चौक येथे असणार आहेत. रामवाडी ते वाघोली या विस्तारित मार्गाची लांबी ११.६३ किमी असून हा मार्ग देखील उन्नत असणार आहे. या मार्गावर ११ स्थानके असतील. ही स्थानके विमान नगर, सोमनाथ नगर, खराडी बायपास, तुळजा भवानी स्थानक, उबाळे नगर, अप्पर खराडी रोड, वाघेश्वर मंदिर, वाघोली, सिद्धार्थ नगर, बकोरी फाटा, विठ्ठलवाडी येथे असतील. या दोन्ही मार्गीकांची एकत्रित लांबी १२.७५ किमी असून यांवर एकूण १३ स्थानके असतील. या दोन्ही विस्तारित मार्गिका बांधण्यासाठी एकत्रित अंदाजे खर्च ३७५६.५६ करोड इतका खर्च येणार आहे.




या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री श्रावण हर्डीकर यांनी म्हणले आहे की, "वनाझ ते रामवाडी मार्गासाठी हा नैसर्गिक विस्तार आहे असून राज्य सरकारने त्याला मान्यता दिली आहे. या मंजुरीमुळे या मार्गांची कामे जलद होणार असून, नगर रस्त्यालगतच्या रहिवाशांना या मार्गिकेचा लाभ मिळणार आहे. शिवाय, रामवाडी ते वाघोली पट्ट्यालगत असलेल्या आयटी कंपन्या, वित्तीय संस्था, शाळा आणि महाविद्यालयांसाठी सुलभता वाढवेल, ज्यामुळे रहदारीच्या नगर रस्त्यावरील गर्दी कमी होईल. त्याचप्रमाणे वनाज ते चांदणी चौक विस्तारीकरणामुळे परिसरातील रहिवासी आणि कार्यालयांना मदत होणार आहे."